Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# कर्माला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे : संत शिरोमणी सावता महाराज

डॉ. काळे राजीव आबाराव

पावन तो देश, पावन ती भूमी जेथे हरिची दास जन्म घेती | याअक्षर सत्या प्रमाणेच महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत जनानी सकळ मानव जातीला अद्नानातून सद्नानाकडे, अंधारातून प्रकाशाकडे यामार्गातून नेहले. ऐवढ्यच नव्हेतर जाती पातीच्या बेड्या अमान्य केल्या. अन चंद्रभागेच्या वाळवंटात अध्यातमिक लोकशाही उभी केली. बाराव्या शतकात यादवाच्या राजवटी मध्ये जनता सुखात नांदत होती. अध्यात्माचे धडे गिरवत होती. परंतु याच काळात दुसरीकडे अंधश्र्धेने थैमान घातले होते. पुरोहिताने ईश्वर व शिष्य यामध्ये अंतर निर्माण करून अंधश्र्धेला खतपाणी घातले होते. याच परिस्थित विचाराला अनेक सांप्रदाय समाज जागृतीसाठी लढत होते. त्यात वारकरी सांप्रदाय हा अग्रणी होता. अनेक संत विठ्ठल भक्तीच्या माध्यामातून अभंगातून जनजागरण करत होते. याकाळतच साधरणत: तेराव्या शतकात अरण ता. माढा जि. सोलापुर येथे सावता महाराज यांचा जन्म इ. स. १२५० मध्ये झाला होता.

सावता महाराज हे संत मालिकेतील वयाने सर्वात जेष्ठ असणारे संत होय. म्हणुनच त्यांचा उल्लेख शिरोमणी असा केला जातो. सावता महाराज हे संत ऩानेश्वर, संत नामदेव, संत गोरोबा काका यांचे समकालीन होय. अभंगाच्या गंगोत्री ते जनक सावता महाराजांना म्हटल्यास वावगे ठरणार नाही. तत्कालीन पुरोहितांच्या प्रतिगामी विचाराला छेद देणारे संत सावता महाराज आहेत. मोक्षासाठी भक्ती, मोक्षासाठी सन्यास या विचाराला मुठमाती देऊन सर्व सामान्यांचे प्रतिनिधीत्व सावता महाराज यांनी केले. ईश्वर प्राप्तीसाठी या सर्व गोष्टी निर्थक मानुन कर्मालाच प्राधान्य दिले. कर्मप्रधान भक्तिमार्ग जगाला दिला. सकळ मानव जातीला पुरोगामी विचारांची वाट निर्माण करून दिली. सावता महाराज म्हणतात,

स्वकर्मात व्हावे रत | मोक्ष मिळे हातोहात |

सावता महाराजांनी आपल्या मूळ व्यवसायाला अध्यात्माचे रूप दिले. कर्म हीच ईश्वर भक्ती हा नवा भक्तिमार्ग जन सामान्यांना दिला. कर्माची पूजा हीच ईश्वराची पूजा आहे. प्रत्येकांनी आपण आपला व्यवसाय निष्ठेने, प्रमाणिकपणाने करावा असा मौलिक संदेश सावता महाराजांच्या अंभगवाणीतून मिळतो. तत्काळातील सर्व संत

वेगवेगळ्या जातीमध्ये जन्माला आले असल्याने प्रत्येकाचा व्यवसाय वेगळा परंतु त्यांनी त्यांच्या व्यवसायात ईश्वराला शोधले. आपले कर्म ढळु दिले नाही. गोरोबा काका, नरहरी महाराज, सेना महाराज आदि संतांनी आपले व्यवसायातच विठ्ठलाला शोधले. सावता महाराजांनी पुरोगामी विचार हे मानव जातीच्या कल्याणासाठी मांडले. अंधश्रदधा, प्रतिगामी विचार यापासुन संबध समाज कोसो दुर राहुन आपल्या कर्म कर्तव्याला महत्व देऊनच कर्तृत्ववान बनवु शकतो. ईश्वर भक्ती साठी संसाराचा त्याग करणे. ही बाब सावता महाराजांनी अमान्य केली. संसार हा मानवाचा अविभाज्य भाग आहे. ईश्वर भक्ती ही संसारात राहुन करता येते. हा आर्दश समाजा पुढे सावता महाराजांनी मांडला.

||प्रपंच असोनी प्रमार्थ साधावा, वाचे आठवावा पांडुरंग||

हे सावता महाराजांचे संत वचन केवळ सांगण्यासाठी नव्हे तर त्यांनी ते कृतियुक्तेने सिध्द करून दाखवले. व्यवसायातच देव आहे असे सांगणारे सावता महाराज कर्मनिष्ठ होते. म्हणुनच ते सांगतात,

||कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी||

आपला व्यवसाय परमेश्वर स्वरूप करून टाकणारे संत सावता महाराज कर्माला महत्व देतात.

आमुची माळीयाची जात |शेत लावु बागायत|

आपल्या व्यवसायावर, कर्मावर निष्ठा, प्रमाणिकपणा हे सावता महाराजांचे वेगळेपण सांगता येईल. प्रत्येकाचे आयुष्यहे संघर्षशील असते. आयुष्यात सुख-दु:खाचे चढ उतार येतात म्हणुन जगणे नाकारणे हे सावता महाराजांनी अमान्य केले आहे. जनास उपदेश करतांना सावता महाराज म्हणतात,

|समयासी सादर व्हावे, देव ठेविले तैसे रहावे|कोणे दिवसी बसुन हत्तीवर, कोणे दिवशी पालखी सुभेदार|

मानवाने आयुष्यात आलेल्या प्रत्येक प्रसंगाचे स्वागतच करावे. हा उपदेश महाराष्ट्रात असलेल्या शेकतर्यांच्या आत्महत्तेचा विचार प्रवृत्त करणारा आहे. जातिभेद या बाबी संत मंडळीला अमान्य होत्या. जात कोणतीही असली तरी त्याच्याठायी कर्मनिष्ठा असलीच पाहिजे.

भली केली हिन याती |नाही वाढली महती|जरी असता ब्राम्हण जन्म तरिही अंगी लागते कर्म|

संत सावता महाराज हे झाडा फुलावर जिवापाड प्रेम करणारे संत होते. म्हणुनच त्यांची फळे, फुले, पाने यांची औषधोपचार ते गरजुना देत असत. आपल्या प्राप्त न्नाचा उपयोग त्यांनी जनसामान्यांसाठी केला होता.

अंधश्रदयेच्या विरोधात सावता महाराज वेळप्रसंगी उभे राहिले होते. आपल्याच शेतात मध्यभागी असलेला म्हसोबा मुळे शेती पडिक पडली होती. तोच म्हसोबा सावता महाराजांनी शेतीच्या बांधावर ठेवला. हा प्रकार ऐवढ्यावर थांबला नाही तर तत्कालीन लोकांच्या अदनानी पणामुळे सावता महाराजावर समाज कंठकांनी हल्ला केला. पण सावता महाराज आपल्या निर्णयावर ठाम राहिले. आज ही गरज आहे ती अशा बुरसट व प्रतिगामी विचाराला मूळासकट काढुन टाकण्यासाठी या महान संताच्या विचारांना आचाराची जोड देणे महत्वाचे आहे. इ. स. १२९५ मध्ये संत सावता महाराज अनंतात विलिन झाले. वयाची ४५वर्ष कर्मावर निष्ठा ठेऊन कर्मातच ईश्वराला शोधले. ही कर्म निष्ठा सकळ मानव जातीने अवलंबविण्याची गरज आहे. संत शिरोमणी सावता महाराज यांचे विचार हे अक्षरत्व आहे.

पुरोगामी महाराष्ट्राला व सकळ मानवाना प्रेरणादायी व मार्गदर्शक आहेत. दुर्देवाने सावता महाराजांच्या लेखनाविषयी आज ही लेखक मंडळी उदासिन आहेत. तत्काळात काशीबा गुरूव यांनी सावता महाराजांचे अभंग लेखन केले होते. हेच विचारांचे लेणे आपल्यासाठी उपयोगी पडत आहे. आजमितिला त्यांचे३७अंभग पाहावयास मिळतात. सावता महाराजांच्या भक्तीची दखल पांडुरंगाने घेतली होती परंतु त्यांचे जन्म-कर्मभूमी असलेसे श्रीक्षेत्र अरण आजही विकासाच्या बाबतीत समाज व राज्यकर्तांकडुन बेदखल राहिलेले आहे. मानव जातीला पुरोगामी विचारांची शिदोरी देणारे संत सावता महारांजाचा गौरव संत नामदेव महाराज, आपल्या अंभगरचनेतून केला आहे.

|धन्य तेअरण |रत्नाचीच खाण |जन्मला निधान | सावता तो |

**संदर्भ:-**

१ ) संत आणि सायन्स - प्रा मा. का. देशपांडे

२) संत साहित्य : एक रुपवेध - डॉ. सुहासिनी ईर्लेकर